पुणे शहर पोलीस

# दर्पण

डिसेंबर २०१९

# अभिप्राय...

प्रती,

**मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
मुंढवा पोलीस ठाणे ,पुणे शहर.
यांना सविनय सादर

**रिपोर्ट** :- पी.एस.भोसले, पो.ना.४४, मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

**विषय** :- दर्पण पुस्तकाबाबत...

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी मुंढवा पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्य करीत असताना नागरीक आपले विविध तक्रारी घेऊन पोलीस ठाणे येथे येत असतात. ठाणे अंमलदार कक्षात नागरीक बसलेले असताना तेथे ठेवण्यात आलेले दर्पण पुस्तक घेऊन ते त्यामधील पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत वाचुन पोलीसांचे कौतुक व समाधान व्यक्त करीत असतात. पुणे पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाची माहिती दर्पण पुस्तकामुळे नागरीकांस मिळते त्याबाबत नागरीकांनी कौतुक व समाधान व्यक्त केल्यामुळे आम्हास चांगले काम करण्याची स्फुर्ती मिळते.

मा.सादर व्हावे.
ता.१८/०६/२०१९

पी.एस.भोसले
पोलीस नाईक ४४
मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

---

दि-१३/०६/२०१९

नाव- [illegible]

विषय-: दर्पण पुस्तिका २०१८ बाबत अभिप्राय...

महोदय,

मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी

[illegible]

[illegible]

# उत्कृष्ट कार्य

कार्य
उत्कृष्ट

# विश्वासासाठी नावीन्यपूर्वक कामाची गरज

## सुबोधकुमार जायसवाल । १७वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा समारोप समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**वानवडी :** दैनंदिन कामकाजात उत्साह दाखवत नाही तोपर्यंत ते काम यशस्वीरीत्या पार पडत नाही. नैपुण्य अंगीकारल्याशिवाय यशस्वी होता येत नाही. गुन्ह्यातील तपासात चूक झाली नाही पाहिजे. लहान लहान चुकांमुळे न्यायालयात न्याय मिळत नाही. त्यामुळे जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी नावीन्यपूर्वक काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य, मुंबई पोलीस महासंचालक सुबोधकुमार जायसवाल यांनी केले.

वानवडी राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक २ येथे गुन्हे अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा २०१९ समारोप समारंभ पार पडला. त्या वेळी जवानांना मार्गदर्शन करताना पोलीस महासंचालक जायसवाल बोलत होते. या वेळी विजेत्या संघांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले व राष्ट्रीय स्तरावर लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे महाराष्ट्र राज्य पोलीस दलास प्रथम क्रमांकाची जनरल चॅम्पियन ट्रॉफी मिळवून दिल्याने कौतुक करत शुभेच्छा दिल्या.



शहर पोलीस गुन्हे अन्वेषण विभागास विजयी ट्रॉफी देताना सुबोध कुमार जायसवाल.

याप्रसंगी पुणे शहर आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, पिंपरी चिंचवड आयुक्त संदीप बिश्नोई, गुन्हे अ. वि. अपर पोलीस महासंचालक अतुलचंद्र कुलकर्णी, सुधारगृहचे सुनील रामानंद, कुलवंत कुमार, रितेश कुमार, प्रवीण साळुंखे, दत्तात्रय मंडलिक, प्रकाश गायकवाड, आरती बनसोडे उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत सीआयडी बुलेटिन पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

या स्पर्धेत २५ संघ सहभागी झाले होते. ३६७ स्पर्धकांनी भाग घेतलेल्या स्पर्धांमध्ये पुणे शहर पोलीस दलाने २ सुवर्ण, ४ रौप्य व १ कांस्यपदक मिळवून जनरलशिप ट्रॉफीचे पारितोषिक मिळवले. रनरअप ट्रॉफी कोकण रेंज यांना मिळाली. त्याचबरोबर सायंटिफिक इन्वेस्टिगेशन चषक नवी मुंबई, फोटोग्राफर चषक नाशिक परिक्षेत्राने पटकावला.

लोकसत्ता – दि.२० डिसेंबर, २०१९

# कचरापेटीत सापडलेल्या बालिकेची शैक्षणिक जबाबदारी पोलिसांनी स्वीकारली

## पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांचा पुढाकार

**प्रतिनिधी, पुणे**

**पोलीस म्हटले** की सामान्यांच्या डोळ्यासमोर एक विशिष्ट प्रतिमा उभी राहते. पोलिसांविषयी समाजात फारसे चांगले मत व्यक्त केले जात नाही. पण शेवटी पोलीस देखील एक माणूस असतो. समाजातील विविध घटनांचा तो जवळचा साक्षीदार असतो. विश्रांतवाडी भागातील एका सोसायटीच्या कचरापेटीत सापडलेल्या नवजात बालिकेची जबाबदारी त्या भागातील गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी स्वीकारली आहे.

मुलीचा ताबा संस्थेकडे जाणार आहे. त्यानंतर तिच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी कदम उचलणार आहेत. कदम यांनी दाखविलेल्या सामाजिक जाणिवेमुळे बेवारस अवस्थेत सापडलेल्या नवजात मुलीच्या भावी आयुष्याला निश्चित कलाटणी मिळेल. विश्रांतवाडी भागातील एकतानगर परिसरात असलेल्या स्नेहबंध सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर असलेल्या कचरापेटीत कपड्यात गुंडाळेली नवजात बालिका ठेवण्यात आली होती. या भागातील रहिवाशांच्या निदर्शनास हा प्रकार आला आणि त्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने बालिकेला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर गुन्हा दाखल करण्याचे सोपस्कार पार पाडण्यात आले.

पोलीस नाईक विनायक मुधोळकर यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार नवजात बालिकेला कचरापेटीत ठेवून जाणाऱ्या पालकांविरोधात गुन्हा (भादंवि ३१७) दाखल करण्यात आला. नवजात बालिकेचा सांभाळ करण्यास असमर्थ असलेल्या दाम्पत्याने नवजात अर्भक कचरा पेटीत टाकले असावे किंवा अनैतिक संबंधातून जन्मास आलेल्या बालिकेचा सांभाळ करणे शक्य झाले नसल्याने त्यांनी जबाबदारी झटकली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, विश्रांतवाडी पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यांनी नवजात बालिकेची शैक्षणिक जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दर्शविली. बालिकेचा ताबा संस्थेकडे जाईल. त्याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तिचा शैक्षणिक खर्च मी करणार आहे, असे कदम यांनी नमूद केले.

> “ २००७ मध्ये मी मुंबईत नेमणुकीस होतो. त्यावेळी बेवारस अवस्थेत सापडलेल्या नवजात बालिकेची शैक्षणिक जबाबदारी मी स्वीकारली होती. विश्रांतवाडीत सापडलेल्या बालिकेच्या ताबा कोणत्या संस्थेकडे द्यायचा, याबाबतची कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर भावी आयुष्यात तिला चांगले शिक्षण मिळावे, या विचाराने मी तिच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी स्वीकारणार आहे.
>
> – **रवींद्र कदम**, पोलीस निरीक्षक, गुन्हे, विश्रांतवाडी पोलीस ठाणे

# तिघा नायजेरियनांना तीन वर्षे सक्तमजुरी

पुणे : प्रतिनिधी

मॅट्रिमोनी साईटवरून ओळख करून तरुणीला ऑनलाइन ३८ लाख रुपयांचा गंडा घालणाऱ्या तीन नायजेरियन व्यक्तींना तीन वर्षे सक्तमजुरी व पाच लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी एम. एम. राऊत यांच्या न्यायालयाने हा आदेश दिला. दंड न भरल्यास अतिरिक्त सहा महिने कारावास भोगावा लागेल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

ओगेयुरी इम्मनुल चिनासो, ओसारामेनसे समार्ट आणि टोपे ओलूओले अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणात अतिरिक्त सरकारी वकील अतिरिक्त सरकारी वकील व्ही. सी. मुरलीकर यांनी दहा साक्षीदार तपासले. त्यानंतर कोर्टाने तीन आरोपींना सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. तर, खटल्यातील कामकाजात पोलिस नाईक रमाकांत बारामतीकर यांनी सहकार्य केले.

# कर्तव्य मेळाव्यात पुणे पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

पुणे : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पोलिस कर्तव्य मेळाव्यात पुणे पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी करीत प्रथम क्रमांक प्राप्त करून जनरल चॅम्पियनशीप व सीआयडी सेन्टेनरी ट्रॉफी असा दुहेरी मान प्राप्त केला व शहर पोलिसांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

पोलिस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कौशल्याची चाचणी

- **जनरल चॅम्पियनशीपसह सीआयडी सेन्टेनरी ट्रॉफीचाही मान**

करण्यासाठी व व्यावसायिक गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रत्येक वर्षी पोलिस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन केले जाते. या वर्षीचा मेळावा राज्य राखीव बल गट क्रमांक एक व दोन रामटेकडी येथे संपन्न झाला. सहायक निरीक्षक अर्चना पाटील, पोलिस नाईक एस. पी. हावळे, हवालदार पी. एस. ढोरजे, हवालदार एस. डी. शिरतोडे, यांनी संघनायक पोलिस निरीक्षक उत्तम चक्रे खडक पोलिस ठाणे यांच्या नेतृत्वाखाली पदकांची कामगिरी केली. पदक प्राप्त करून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्व खेळाडूंचे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम्, सह पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे , उपायुक्त बच्चन सिंह यांनी अभिनंदन केले.



विजेत्या पथकासह पोलिस अधिकारी.

# सायबर विभागामुळे कॉण्ट्रॅक्टरला मिळाले ८० लाख

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी)– सायबर चोरट्यांनी ठेकेदाराच्या खात्यातून ट्रान्स्फर केलेली तब्बल ८० लाखांची रक्कम सायबर विभागामुळे एका दिवसात मिळाली आहे. संबंधित खाते गोठविल्याने २४ तासांच्या आत खात्यावर रक्कम पुन्हा जमा झाली.

गव्हर्नमेंट कॉण्ट्रॅक्टरच्या कंपनी खात्यातून सायबर चोरट्यांनी ७ डिसेंबरला पैसे ट्रान्स्फर करून फसवणूक केली. पोलिसांनी तक्रारीचे स्वरूप जाणून घेऊन फसवणूक झालेली रक्कम कोणत्या बँकेत ट्रान्स्फर झाली, याचा शोध घेतला. ही रक्कम राजस्थान, जयपूर येथील देना बँकेचे ग्लोब ईंपेक्स ट्रेडर्स या खात्यावर जमा झाल्याचे लक्षात आले. त्यानुसार सायबर पोलिसांनी संबंधित बँकेला ई-मेल पाठवून ती रक्कम गोठविण्याचे सांगितले. त्यानंतर रक्कम अर्जदारांच्या खात्यावर पुन्हा पाठविण्याची विनंती केली. त्यानुसार बँकेने त्याचदिवशी अर्जदाराच्या खात्यावर ८० लाख रुपये जमा केले. याप्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार नांगरे, नाईक मोहिते, शिपाई मालसुरे, आव्हाड तपास करीत आहेत.

# अभिप्राय...

## - दर्पण विशेष अंक संदर्भात अभिप्राय –

दर्पण म्हणजे आरसा. पोलीसांनी केलेल्या चांगल्या व जनहित कारक कामाचे बाबतीत, प्रसिध्दी माध्यमाकडून नेहमीच दुर्लक्ष केले जाते. अपवादात्मक परिस्थीती वगळता पोलीसांचे लोक कल्याणकारी व चांगले कामास कधीच प्रसिध्दी दिली जात नाही. याउलट एखादया नकारात्मक बातमीस प्रभावीपणे प्रसिध्दी दिली जाते. यामुळे पोलीसांचे कार्यपध्दती बाबत जनमाणसांचे मनात नेहमीच नकारात्मक भावना निर्माण होत होती.

परंतु, मा.पोलीस आयुक्त पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाने, पुणे शहर पोलीसांकडून पोलीसांचे चांगले काम (Good work) बाबतचा दर्पण विशेष अंक प्रसिध्द होत असल्याने पोलीसांचे चांगले कामाची जनतेस आरशाप्रमाणे माहिती उपलब्ध होत असल्याने पोलीसांचे कामकाजाविषयी नागरीकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होण्यास व पोलीसांची प्रतिमा उंचावणेस नक्कीच मदत होत आहे.

बी.ए.गायकवाड
पो.हवा.ब.नं.४५९०
येरवडा पोलीस स्टेशन पुणे.

---

दि. ३१/०६/२०२३
भारती विद्यापीठ पो.स्टे.
पुणे

नाव:- सुनिल यादवराव देशमाने
पो.हवा. ४४०६, भा.वि.पो.स्टे. पुणे

विषय:- पुणे शहर पोलीस दलातील दर्पण पुस्तिकेच्या अभिप्राय बाबत.

महोदय,

सन २०१८ या वर्षापासून मा. पोलीस आयुक्त सो. यांनी दर्पण पुस्तकाचा उपक्रम अविरत चालू ठेवला आहे.

या मासिकामध्ये असणाऱ्या पेपर कटींग व बातम्या या वरून पो. ठाणे येथे येणारे पुणे नागरीक तसेच पो. अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या ठाण्यातील आपल्या सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबाबत माहीती मिळते तसेच आपण काहीतरी चांगल्या गोष्टी करण्यास यावरून प्रोत्साहन मिळते तसेच आपण करीत असलेल्या कामात काहीतरी बदल करावा असे प्रत्येक पो. अधि. व कर्मचारी यांना मार्गदर्शन या पुस्तकाद्वारे मिळत आहे.

मा. सा. दावे

(S. Y. देशमाने)
HC 4406


MPSC aspirant, his friend held for finance co robbery
पोलिसांच्या दक्षतेमुळे मिळाली दागिन्यांची पिशवी
Ex-director of IT firm held for data robbery
अवैध धंद्यांची यादी पोलीस वेबसाइटवर जाहीर
एस्कॉर्टसाठी तरुणी पुरविणाऱ्यास अटक
दोन सोनसाखळीचोरांना अटक
'सेल्फी'वरून काढला आरोपीचा माग
तरुणाच्या खुनातील सहा आरोपी अटकेत
Cyber police crackdown on 2K bank accounts in Rajasthan
नववर्षाच्या स्वागतासाठी पोलीसही झाले सज्ज
सराईत गुन्हेगार जाळ्यात
'उत्तम संवाद हा मुलांचे भविष्य घडविण्याचा राजमार्ग'
शहर पोलीस करणार चिंतामुक्त ड्युटी
पोलीस दलाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी शाळांमध्ये कवायत
13,000 offenders booked for drink driving in 2019
जीवनाच्या स्पर्धेत यशस्वी
खाकी वर्दीला डाग
2 detained for questioning in MBA grad murder case
WHAT HAPPENED?
मोबाईल अचानक बंद पडतो तेव्हा!
सायबर गुन्ह्यांबाबत आता विद्यार्थ्यांसाठी जागरूकता अभियान